आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२९ मे २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीत स्थूल राष्ट्रीय उत्पादनात ७ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढ राहण्याचा स्टेट बँक ऑफ इंडियाचा अंदाज

- रुद्रा एम टू या स्वदेशनिर्मित क्षेपणास्त्राची ओदिशातल्या हवाई दल तळावर यशस्वी चाचणी

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६६८ अंकांची घसरण

**आणि**

- नैर्ऋत्य मोसमी पाऊस येत्या २४ तासात केरळात दाखल होण्यासाठी अनुकूल स्थिती /विदर्भात उष्णतेची लाट राहण्याची शक्यता

**<><><><><>**

आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीत भारताचा जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादनात ७ पूर्णांक ४ दशांश टक्के, तर २०२४ मधे जीडीपीत ८ टक्के वाढ होईल, असा अंदाज स्टेट बँक ऑफ इंडियानं व्यक्त केला आहे. देशाच्या ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात सातत्यानं आर्थिक वाढ होत असल्याचं स्टेट बँकेच्या ताज्या अहवालात म्हटलं आहे. प्रवासी वाहन विक्री, जीएसटी संकलन, क्रेडिट कार्डचा वापर, टोल संकलन यांचा शहरी भागातल्या आर्थिक वाढीत वाटा आहे. तर ग्रामीण भागात दुचाकी विक्री आणि पेट्रोलियम पदार्थांच्या वापराचा वाटा जास्त असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

रुद्रा एम टू या स्वदेशनिर्मित क्षेपणास्त्राची चाचणी आज ओदिशातल्या हवाई दल तळावर यशस्वी झाली. डी आर डीओ म्हणजेच संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं ही चाचणी घेतल्याचं संरक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. आकाशातून जमिनीवर मारा करणाऱ्या या क्षेपणास्त्राचा मारा हवाई दलाच्या Su-30 MK-I तळावरुन करण्यात आला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी या चाचणीबद्दल डीआरडीओ आणि हवाई दलाचं अभिनंदन केलं आहे. डीआरडीओ चे अध्यक्ष डॉ. समीर कामत यांनीही संघटनेच्या पूर्ण चमूचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

राज्यातल्या इयत्ता तिसरी ते बारावीच्या अभ्यासक्रमाच्या आराखड्याचा मसुदा राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेनं तयार केला असून तो संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (एनसीएफ-एसई) २०२३ मधल्या तरतुदी विचारात घेतल्या असून त्यात राज्याच्या अनुषंगानं अंशत: बदल केले आहेत. पहिली ते दहावी मराठी आणि इंग्रजी भाषा अनिवार्य, सहावीपासून हिंदी, संस्कृत आणि इतर भारतीय, किंवा परदेशी भाषा शिकण्याचा पर्याय,तसंच अकरावी - बारावीसाठी दोन भाषांचा समावेश असेल. तिसरीपासून व्यावसायिक शिक्षणाची सोय, तिसरी ते आठवीपर्यंत पूर्व व्यावसायिक कौशल्यं आणि नववीपासून विशेष व्यावसायिक शिक्षणाची सोय उपलब्ध होणार आहे. त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डाटा सायन्स, कृषी आदी नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम उपलब्ध होणार आहेत. गणित आणि विज्ञान विषयांचे दोन स्तरावरचे अभ्यासक्रम उपलब्ध करण्याचा विचार आहे. आंतरविद्याशाखीय शिक्षणांतर्गत पर्यावरण शिक्षण प्रस्तावित आहे. भारतीय प्राचीन ज्ञान, सांविधानिक, मानवी आणि नैतिक मूल्यांचं

शिक्षण, शारीरिक आणि मानसिक आरोग्य याबाबत तसेच शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन, शैक्षणिक तंत्रज्ञान, इत्यादी बाबींचा समावेश केला आहे. या मसुद्याबाबत सर्व समाज घटक, शिक्षक, पालक, शिक्षण तज्ञ, शैक्षणिक संस्था इत्यादी संबंधितांनी येत्या ३ जून पर्यंत अभिप्राय नोंदवावेत, असं आवाहन परिषदेनं केलं आहे.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यातला प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. उद्या संध्याकाळी प्रचार थंडावणार असल्यानं सर्वपक्षीय नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे.

**<><><><>**

देशाच्या नागरिकांनी केंद्रात भाजपप्रणित रालोआ सरकार निवडून आणलं, त्यामुळेच आज जग भारताकडे आदरानं पाहतोय ही गोष्ट शक्य झाली असं प्रधानमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज पश्चिम बंगालमधे मथुरापूर इथं प्रचारसभेला संबोधित करताना बोलत होते. यावेळी त्यांनी गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारनं केलेल्या कामांची उजळणी केली. भारताचं सुवर्णयुग घडवण्यात आगामी पाच वर्षे निर्णायक भूमिका बजावणार आहेत, त्यामुळे २०२४ची लोकसभा निवडणूक महत्वाची असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><>**

इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर शेतमालाला किमान आधारभूत किंमत दिली जाईल. तसंच शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं जाईल, असं आश्वासन काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आज दिलं. पंजाबमध्ये लुधियाना इथं काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारासाठी आयोजित सभेत ते बोलत होते. या निवडणुकीत आपण संविधानाचं

रक्षण करण्यासाठी लढत आहोत असंही गांधी म्हणाले. पंजाबमधल्या अंमली पदार्थांच्या वाढत्या व्यसनाबद्दलही गांधी यांनी यावेळी चिंता व्यक्त केली.

**<><><><>**

काँग्रेस राज्यात विधान परिषदेच्या दोन जागा लढवणार असून २ जूनला उमेदवारांची घोषणा केली जाईल, अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. राज्यातल्या ७५ टक्के भागात कोरडा दुष्काळ असून काँग्रेस ३१ मे पासून दुष्काळ पाहणी दौऱ्यावर जात असल्याचं त्यांनी सांगितलं. प्रत्येक विभागाचा दौरा करून विभागीय आयुक्तांना निवेदन दिले जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><>**

जागतिक शेअर बाजारातल्या नकारात्मक परिस्थितीमुळे सेन्सेक्स आणि निफ्टी आज सलग चौथ्या दिवशी घसरले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ६६८ अंकांनी घसरून ७४ हजार ५०३ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी १८३ अकांच्या घसरणीनंतर २२ हजार ७०५ वर बंद झाला. एकंदर सात क्षेत्रांमध्ये वाढ, तर १३ क्षेत्रांमध्ये घट पाहायला मिळाली. शेअर बाजारात आज १ हजार ६८० कंपन्यांचे समभाग वधारले, २ हजार १३६ कंपन्यांचे समभाग कोसळले, तर ११३ कंपन्यांच्या समभागांमध्ये कोणताही बदल झाला नाही.

**<><><><>**

रत्नागिरी जिल्हा परिषद शाळेतल्या २० विद्यार्थ्यांची अमेरिकेतल्या नासा संस्थेत अभ्याससहलीसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी जिल्हा परिषेदनं तीन परीक्षा घेतल्या. त्यात सहभागी झालेल्या २३ हजार विद्यार्थ्यांमधून

या २० जणांची निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थी आणि पालकांची जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी भेट घेत त्यांना शुभेच्छा दिल्या.

**<><><><><>**

नागपूरमध्ये आज ५० एफपीओ अर्थात शेतकरी उत्पादक संस्थांना शेतमालाची किंमत जोखीम निवारण आणि वस्तू बाजारविषयक प्रशिक्षण देण्यात आलं. नागपूरच्या वनामती इथल्या वसंतराव नाईक राज्यकृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेनं आयोजित केलेल्या या एक दिवसीय प्रशिक्षणात कृषीमाल विपणन क्षेत्रातले तज्ञ श्रीकांत कुवळेकर यांनी मार्गदर्शन केलं.

शेतमालाची आधुनिक विक्री व्यवस्था समजून घेऊन आपल्या कृषी मालाची विक्री कशी करावी. शेतमालाच्या दरांनुसार नियोजन करून विक्रीतल्या जोखमीचं नियोजन कसं करावं याविषयी त्यांनी मार्गदर्शन केलं. वस्तू बाजाराची ओळख आणि व्यवस्थापन, कृषी माल आणि आंतरराष्ट्रीय व्यापार अशा विविध विषयावर या सहभागी शेतकऱ्यांना मार्गदर्शन देण्यात आलं. या प्रशिक्षणाचं उद्घाटन रामेती, अर्थात प्रादेशिक कृषीविस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य डॉ. विद्या मानकर यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

पुण्याच्या कल्याणीनगर अपघात प्रकरणी ससून रुग्णालयाचे दोन डॉक्टर आणि एका शिपायाला आज निलंबित करण्यात आलं. या अपघातातल्या अल्पवयीन आरोपीच्या रक्ताच्या नमुन्यांची अदलाबदली केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हलनोर आणि शिपाई अतुल घाटकांबळे यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. या तिघांना निलंबित करण्याचा प्रस्ताव पोलिसांनी काल आरोग्य विभागाला पाठवला होता.

दरम्यान, या प्रकरणातल्या अल्पवयीन आरोपीच्या जामीन अर्जावरची सुनावणी न्यायालयानं आज १ जूनपर्यंत स्थगित केली आहे.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यातल्या लाखनी इथल्या ग्रामीण रुग्णालयात १८ मे रोजी नवजात बालकाचा मृत्यू झाला होता. हा मृत्यू डॉक्टर आणि परिचारिकांच्या हलगर्जीपणामुळे झाल्याचा आरोप बालकाचे पिता रविकांत फाये यांनी केला आहे. त्यांनी लाखनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून याप्रकरणी मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

**<><><><><>**

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री अर्थात ‘फिकी’नं नवी दिल्ली इथं कोल्ड चेन आणि लॉजिस्टिक्स परिषदेचं आयोजन केलं आहे. भारतात तयार होणाऱ्या नाशिवंत वस्तूंच्या उद्योगाला चालना देण्यासाठी कार्यक्षम कोल्ड चेन यंत्रणा विकसित करण्याच्या दृष्टीने नवनिर्मितीला चालना देणं हा या परिषदेचा उद्देश आहे. या विषयावर चर्चा होणं ही काळाची गरज असल्याचं प्रतिपादन वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे संयुक्त सचिव डॉ. सुरेंद्र अहिरवार यांनी या परिषदेला संबोधित करताना केलं. या चर्चेतून औषधनिर्मिती, अन्न, तेल आणि फुलं यासारख्या क्षेत्रामध्ये दळणवळणाची व्यवस्था नव्याने उभारण्यास मदत होईल, असंही अहिरवार यांनी सांगितलं. संपूर्ण देशातून विविध क्षेत्रांमधले २५० पेक्षा जास्त प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

लातूरमध्ये एमआयडीसीत सुरू असलेल्या गुटख्याच्या कारखान्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे. यात गुटखा बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल, बनावट

गुटखा, एक ट्रक आणि एक पिक अप जप्त करण्यात आलं आहे. याची किंमत ३ कोटी ५ लाख ७३ हजार रुपयांहून अधिक असल्याचं पोलिसांनी सांगितलं. याप्रकरणी सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

धाराशिव जिल्हा परिषदेचे कामकाज ई - ऑफिस प्रणाली द्वारे सुरू झालं असून पेपरलेस कामकाज करणारी धाराशिव ही मराठवाडा विभागात पहिली जिल्हा परिषद ठरली आहे. याविषयी आमच्या वार्ताहरानं माहिती दिली….

**होल्ड…व्हाईस कास्ट (३२ सेकंद)**

*धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मैनक घोष यांच्या संकल्पनेतून  ई- ऑफिस प्रणाली द्वारे जिल्हा परिषदेच कामकाज सुरू होण्यास प्रारंभ झाला आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांची प्रशिक्षणं पूर्ण झाली असून स्वतंत्र ई-मेल आयडी कार्यान्वित होवून सुरू झालं पेपरलेस कामकाज………*

*यामुळे फाइल्स प्रलंबित राहण्याचं प्रमाण शून्यावर येणार असून , चालू तारखेतच काम होणार असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या कामात गतिमानता येणार आहे. ई -ऑफिस प्रणाली मुळे कागदांचा अपव्यय कमी होऊन अभिलेखे वर्गीकरण आणि जतन करण्याचा भार देखील कमी होणार आहे. या ई-ऑफिस प्रणाली कामकाजामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची काम जलदरीत्या पूर्ण होऊन गतिमान प्रशासनाचा सुखद अनुभव जिल्हावासीयांना मिळणार आहे.*

**<><><><><>**

सांगली जिल्ह्यात काल मध्यरात्री तासगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या कार अपघातात एकाच कुटुंबातल्या सहा जणांचा मृत्यू झाला, तर एक

महिला जखमी झाली आहे. कवठेमहांकाळ तालुक्यातल्या कोकळे इथून घरी परतत असताना मणेराजुरी-तासगाव मार्गावर ही गाडी कॅनॉलमधे कोसळली.

**<><><><>**

परभणी इथं मोटार सायकल चोरी करणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. आरोपीकडून आतापर्यंत बीड, परळी, लातूर, मरूड, बार्शी-सोलापूर जिल्ह्यातून चोरलेल्या २० मोटार सायकली जप्त करण्यात आल्या आहेत. त्याचा साथीदाराकडे आणखी काही मोटार सायकली असल्याची माहिती त्यांनी पोलिसांनी दिली आहे. न्यायालयाने आरोपीला 4 दिवसाची पोलीस कोठडी सुनावली असून पोलिस पुढचा तपास करत आहेत.

**<><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सामना चे कार्यकारी संपादक खासदार संजय राऊत यांना मानहानीची कायदेशीर नोटीस बजावली आहे. लोकसभा निवडणुकीत पैशाचा वापर केल्याचा आरोप केल्याबद्दल राऊत यांना ही नोटीस पाठवण्यात आली असून येत्या ३ दिवसात राऊत यांनी जाहीर माफी न मागितल्यास सामना विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा नोटिशीत देण्यात आला आहे.

**<><><><>**

शेतीसाठी ड्रोन द्वारे फवारणी करण्याच्या तंत्रज्ञानाच्या माहितीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तसंच ड्रोन तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी परभणी इथल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि वाव गो ग्रीन या कंपनीच्या संयुक्त विद्यमाने “ड्रोन तंत्रज्ञान आपल्या दारी” हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी अनेक गावांमध्ये ड्रोन फवारणी प्रात्यक्षिक तसंच खरीप पेरणीपूर्व मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस येत्या २४ तासात केरळात दाखल होण्यासाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली असल्याचं भारतीय हवामानशास्त्रविभागाने म्हटलं आहे. दरम्यान आज राज्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली. सर्वात जास्त कमाल तापमान ब्रह्मपुरी इथं ४५ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सियस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून हवामान उष्ण आणि दमट राहील तसंच विदर्भात हवामान कोरडं राहणार असून उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचं हवामानशास्त्र विभागाच्या वृत्तात म्हटलं आहे.

**//<><><><><>//**